नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - ६ Issue - 6 | वार - रविवार दि. ३१ मे २०२६ Blow- Sunday Date 31 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राजस्थानात वाळूच्या वादळाचा कहर!

## भरदिवसा अंधार, ताशी ७० किमी वेगाने धुळीचा तांडव; वाहतूक ठप्प



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जयपूर : राजस्थानच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये आज (३० मे) निसर्गाचा भीतीदायक आणि आश्चर्यकारक अनुभव पाहायला मिळाला. चुरू आणि श्रीगंगानगर परिसरात दुपारी सुमारे २ वाजता अचानक हवामानात मोठा बदल झाला आणि प्रचंड वाळू-धुळीचे वादळ उसळले. काही क्षणांतच आकाश काळवंडले आणि भरदिवसा अंधार पसरला, ज्यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले.

दृष्यमानता शून्य; रस्त्यांवर वाहनांची कोंडी : या धुळीच्या वादळामुळे दृश्यमानता जवळपास शून्यावर आली. रस्त्यांवरील वाहने जागेवर थांबली, तर चालकांना पुढील काही मीटरही दिसत नसल्याने हेडलाइट्सचा आधार घ्यावा लागला. अनेक भागांमध्ये नागरिकांनी सुरक्षिततेसाठी घरातच थांबणे पसंत केले.

ताशी ७० किमी वेगाने ३० मिनिटांचा तांडव :

हवामान विभाग आणि स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, या वादळादरम्यान वाऱ्याचा वेग ताशी सुमारे ७० किमी इतका नोंदवला गेला. जवळपास ३० मिनिटे वाळू आणि धुळीचे ढग आकाशात फिरत राहिले, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

वादळानंतर पावसाची हजेरी; तापमानात मोठी घट :

या वादळानंतर लगेचच हवामानाने वेगळेच रूप घेतले. धूळ खाली बसताच आकाश ढगाळ झाले आणि अनेक भागांमध्ये हलक्या ते जोरदार पावसाला सुरुवात झाली. काही दिवसांपासून ४५ अंश सेल्सिअसच्या वर असलेले तापमान अचानक खाली आले. हवामान विभागानुसार, या बदलामुळे तापमानात सुमारे ८ अंश सेल्सिअसपर्यंत घट झाली असून, नागरिकांना उष्णतेपासून मोठा दिलासा मिळाला आहे.

देशातील इतर राज्यांमध्येही हवामानाचा कहर :

दरम्यान, देशातील अनेक राज्यांमध्येही मान्सूनपूर्व पावसाचा प्रभाव दिसून येत आहे. बिहारमध्ये वीज कोसळून १७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. पाटणामध्ये पावसामुळे विमानसेवा विस्कळीत, अनेक उड्डाणांना उशीर. उत्तर प्रदेशमध्ये मेघगर्जना आणि वादळामुळे ३१ जणांचा मृत्यू. सहारनपूरमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक वाहने पाण्यात वाहून गेली. राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी पावसाचा अलर्ट जारी.

मान्सूनबाबत हवामान विभागाचा अंदाज :

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील ७ दिवसांत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. मात्र यंदाचा मान्सून सरासरीपेक्षा कमकुवत राहू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. खचऊच्या अहवालानुसार, जून ते सप्टेंबर या काळात देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. या हंगामात सुमारे ७८ सेमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, राष्ट्रीय सरासरी ८७ सेमी मानली जाते.

## उभ्या कंटेनरला कारची भीषण धडक; दोन जणांचा जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पोलादपूर: मुंबई-गोवा महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली आहे. पोलादपूरजवळ झालेल्या या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिल मार्कंडे हे आपल्या कुटुंबासह कारने मुंबई-गोवा महामार्गावरून दापोलीकडे जात होते. त्यांच्या कारची रस्त्याच्या कडेला उभ्या कंटेनरला जोराची धडक बसली. धडक एवढी जोराची होती की कारचा चेंदामेंदा झाला.

या अपघातात सुवर्णा मार्कंडे आणि अनुशी अनिल मार्कंडे यांचा जागीच मृत्यू झाला. तर अनिल मार्कंडे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आणखी एक जण किरकोळ जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस आणि स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले. कारमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी जेसीबीची मदत घ्यावी लागली. जखमींना तातडीने पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारांनंतर गंभीर जखमी अनिल मार्कंडे यांना पुढील उपचारांसाठी माणगाव येथे नेण्यात आले आहे.

## भिवंडीत 'मिथेनॉल'चा मोठा साठा जप्त; आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार एफडीएची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर येथे विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे १८ जणांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर भिवंडी येथील मेसर्स रेक्स इंटरनॅशनल या कंपनीवर धाड टाकून मिथेनॉलचा भिवंडी येथे धाड टाकून ५,९२९ किलो साठा जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासात पुणे प्रकरणातील दारूमध्ये वापरण्यात आलेले मिथेनॉल याच कंपनीकडून पुरविण्यात आल्याचे समोर आले आहे.

जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती अथवा आस्थापनेला कोणतीही सवलत दिली जाणार नाही. औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० तसेच संबंधित कायदे व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर व न्यायालयीन कारवाई करण्यात येईल. सुरक्षित अन्न व औषधे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून तो सुनिश्चित करणे हीच आमची सर्वोच्च जबाबदारी आहे, असे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी म्हटले आहे.

विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. अवघ्या ३० रुपयांत विकल्या जाणाऱ्या या दारूमध्ये 'मिथेनॉल' हे विषारी रसायन मिसळण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर मिथेनॉलच्या अवैध साठ्यांविरोधात तातडीने कारवाईचे आदेश दिले.



पोलीस तपासातून उघड झालेले धागेदोरे

पोलीस तपासानुसार, मृत व्यक्तींनी फुगेवाडी येथील कर्नालसिंग विरका यांच्या ठिकाणी हातभट्टीची दारू सेवन केली होती. विरका याला ही दारू योगेश वानखेडे याच्याकडून मिळाली होती. पुढील तपासात योगेश वानखेडे हा उरळी कांचन येथील राजू प्रजापती याच्याकडून दारू घेऊन पुरवठा करत असल्याचे निष्पन्न झाले. या साखळीतील दारूमध्ये वापरलेले मिथेनॉल मेसर्स रेक्स इंटरनॅशनलकडून प्राप्त झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

धाडी मध्ये ५,९२९ किलो मिथेनॉल जप्त

कंपनीचे कार्यालय वाशी येथे असून गोदाम अनंत अँड कंपनी, गाळा क्र. ५४४/ए, म्हात्रे कंपाउंड, अंजूर रोड, वळगाव, भिवंडी येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर आयुक्तांच्या निर्देशानुसार ठाणे येथील औषध निरीक्षक योगेंद्र पोळ यांनी धाड टाकली.

तपासणीदरम्यान कंपनीचे मालक अरुणकुमार चौबे व सक्षम व्यक्ती अभिषेक अरुणकुमार चौबे उपस्थित नव्हते. कारवाईत एकूण ५,९२९ किलोग्रॅम मिथेनॉलचा साठा आढळून आला. मात्र या विषारी रसायनाच्या खरेदी-विक्रीची कोणतीही अधिकृत नोंद, साठा नोंदवही अथवा आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नव्हती.

गुन्हा दाखल; परवाना रद्द करण्याची प्रक्रिया सुरू- विषारी द्रव्य नियमांनुसार आवश्यक नोंदी व व्यवहारांचा तपशील उपलब्ध नसल्याने संबंधित साठा जप्त करण्यात आला. तसेच कंपनीचे मालक अरुणकुमार चौबे आणि सक्षम व्यक्ती अभिषेक अरुणकुमार चौबे यांच्याविरुद्ध नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे

विषारी द्रव्य अधिनियमांतर्गत कारणे दाखवा नोटीस बजावून संबंधित परवाना रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अवैध औषध विक्री, औषधांमधील भेसळ, विषारी रसायनांचा गैरवापर आणि फसव्या जाहिरातींविरोधात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केले आहे.

## ममता बॅनर्जींच्या खासदार भाच्यावर हल्ला; कपडे फाडले, अंडी-दगड फेकले; हेल्मेट घालून जीव वाचवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कोलकाता: पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे भाचे आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाला आहे. सुरक्षा रक्षकांची चपळाई आणि धाडस दाखवत त्यांना हेल्मेट घातलं आणि त्यांच्या भोवती कडं करत त्यांना सुरक्षित स्थळी नेलं. यावेळी तिथे असलेल्या भाजप कार्यकर्त्यांनी बॅनर्जी यांच्या विरोधात 'चोर-चोर' अशा घोषणा दिल्या. पश्चिम बंगालच्या सोनारपूरमध्ये अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाला. या हल्ल्यामुळे परिसरात मोठा तणाव निर्माण झाला आहे. सोनारपूरच्या कमराबाद परिसरात अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाला. तृणमूलचे खासदार असलेले बॅनर्जी शनिवारी संध्याकाळी त्यांच्या पक्षाच्या एका मृत कार्यकर्त्याच्या घरी गेले होते. संध्याकाळी साडे चारच्या सुमारास अभिषेक बॅनर्जी कमराबादला पोहोचले. तेव्हा तिथे आधीपासून भाजपचे नेते, कार्यकर्ते हजर होते. यावेळी महिला कार्यकर्त्यांना पुढे ठेवण्यात आलं होतं. त्यांच्या हातात अंडी होती. जमाव मोठा असल्यानं आणि त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानं अभिषेक बॅनर्जी यांनी स्वत:ची कार सोडून दुचाकीवरुन परिसरात जाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आंदोलकांनी पीडित कुटुंबाच्या घरापासून १०० मीटर अंतरावर त्यांना रोखलं. उपस्थितांनी अभिषेक बॅनर्जी यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यांनी चोर-चोर अशा घोषणा दिल्या. यावेळी संतप्त आंदोलकांनी रस्त्यावर दोन दुचाकी फेकल्या. त्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. आम्ही मजूर आहोत. आम्ही कोणत्याही पक्षाचे सदस्य नाही. आमच्या परिसरात रस्ता झाला नाही. जितका पैसा वरुन आला, तो खाण्यात आला. त्यामुळे आम्ही आजही त्रस्त आहोत. याच कारणामुळे आम्ही संतप्त आहोत, असं स्थानिकांनी सांगितलं. आम्ही भाजपच कार्यकर्ते नाहीत. आम्ही इथले स्थानिक आहोत, असं दुसऱ्या एका आंदोलकानं सांगितलं. अभिषेक बॅनर्जींनी भेट दिलेल्या परिसरातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. जवळपास १ किलोमीटरचा पट्टा खराब स्थितीत आहे. पावसाच्या दिवसांत इथे पाणी साचतं. ममता बॅनर्जी मुख्यमंत्री असताना अनेकदा त्यांच्याकडे विनंती अर्ज करण्यात आले. रस्ते दुरुस्त करा. पाण्याची व्यवस्था सुधारा, यासाठी अनेकदा पाठपुरावा करण्यात आला. पण त्यांचं सरकार असताना मूलभूत समस्या सुटल्या नाहीत, असा स्थानिकांचा दावा आहे. त्यामुळेच ममता बॅनर्जी यांचे भाचे असलेल्या अभिषेक बॅनर्जी यांच्या विरोधात संताप व्यक्त करण्यात आला.

### पाकिस्तानमध्ये तयार केलेली शस्त्रे, ग्रेनेड आणि स्फोटके जप्त

### कट उधळण्यात दिल्ली पोलिसांना यश

# आयएसआय-दाऊद नेटवर्कशी संबंधित दहशतवाद्यांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने मोठी कारवाई करत पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय, दाऊद इब्राहिम गँग आणि शहजाद भट्टी नेटवर्कशी संबंधित आठ आरोपींना अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींकडून पाकिस्तानमध्ये तयार केलेली शस्त्रे, ग्रेनेड आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत.तपास यंत्रणांच्या म्हणण्यानुसार, हे मॉड्यूल दिल्ली, मुंबई, पंजाब आणि चंदीगडमधील प्रमुख धार्मिक स्थळे, सरकारी इमारती, मंत्रालये आणि सुरक्षा दलांना लक्ष्य करण्याचा कट रचत होते. पोलिसांचे म्हणणे आहे की हे नेटवर्क दीर्घकाळापासून सक्रिय होते आणि योजनाबद्ध पद्धतीने हल्ल्यांची तयारी करत होते. अटकेतील आरोपींमध्ये उत्तर प्रदेशातील विजय उर्फ शूटर, झारखंडचा नितीश पासवान, महाराष्ट्रातील तौकीर रिझवान अहमद शेख आणि साजिद महबूब शेख उर्फ अरबाज खान, पंजाबचे हरविंदर सिंग, गगनदीप सिंग आणि मनजीत सिंग तसेच नेपाळचा नागरिक आंग कामी लामा यांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, विजय उर्फ शूटर याला दिल्ली, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेशमध्ये दहशतवादी व गुन्हेगारी कारवाया चालवण्याची जबाबदारी देण्यात आली होती. तसेच दिल्ली-एनसीआरमध्ये युवकांची भरती करून त्यांना या नेटवर्कशी जोडण्याचे काम ही त्याच्याकडे होते.



स्पेशल सेलने विजयला १४ मे रोजी पुण्यातून आणि त्याचा सहकारी नितीश पासवानला १७ मे रोजी झारखंडच्या साहिबगंजमधून अटक केली. तपासात समोर आले की दोघांची भरती मुंबईतील हुजैफा नावाच्या व्यक्तीने केली होती, जो सध्या फरार आहे.विजयच्या चौकशीनंतर पोलिसांनी २७ मे रोजी मुंबईतून तौकीर रिझवान अहमद शेख आणि साजिद महबूब शेख उर्फ अरबाज खान यांना अटक केली. तपासात असेही उघड झाले की हे दोघे आयएसआयशी संबंधित हँडलर यावर खान आणि मुन्ना झिंगाडा यांच्या संपर्कात होते.मुंबईतील आरोपींकडून मिळालेल्या माहितीनंतर पोलिसांना पंजाबमधून एक टीम दिल्लीला येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर स्पेशल सेलने महरौली-बदरपूर रोडवर कारवाई करत हरविंदर सिंग, गगनदीप सिंग आणि मनजीत सिंग यांना अटक केली. तपासादरम्यान नेपाळचा नागरिक आंग कामी लामा यालाही अटक करण्यात आली. तो दिल्लीत आरोपींसाठी निवासव्यवस्था आणि आर्थिक व्यवहार सांभाळत असल्याचे समोर आले आहे.स्पेशल सेलच्या तपासात असेही स्पष्ट झाले की संपूर्ण मॉड्यूल पाकिस्तानस्थित अंडरवर्ल्ड ऑपरेटिव्ह मुन्ना झिंगाडा, शहजाद भट्टी आणि इतर खडखशी संबंधित घटकांच्या संपर्कात कार्यरत होते.पोलिसांचे म्हणणे आहे की मुन्ना झिंगाडा हा दाऊद इब्राहिमचा जवळचा सहकारी होता आणि सन २००० मध्ये बँकॉकमध्ये छोटा राजनवरील हल्ल्यात त्याचा सहभाग होता. नंतर तो सुमारे १७ वर्षे थायलंडच्या तुरुंगात होता. आंग कामी लामा २००१ ते २०१८ या काळात थायलंडमध्ये अंमली पदार्थ प्रकरणात तुरुंगात होता. याच काळात त्याची भेट मुन्ना झिंगाडा आणि इतर पाकिस्तानी नागरिकांशी झाली होती. सुटका झाल्यानंतरही तो त्यांच्या संपर्कात राहिला. अधिकाऱ्यांनी ही कारवाई मोठे यश असल्याचे सांगत संभाव्य दहशतवादी कट वेळेत उधळल्याचे स्पष्ट केले आहे. अटक केल्यानंतर संवेदनशील ठिकाणांची सुरक्षा वाढवण्यात आली असून, तपास यंत्रणा या नेटवर्कचा विस्तार आणि सीमापार संबंधांचा सखोल तपास करत आहेत.

# प्रजाजनासाठी धडपडणाऱ्या अहिल्यादेवी : लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, महाराजे, सम्राट आणि राज्यकर्ते होऊन गेले. काहींनी युद्धे जिंकून इतिहास घडविला, तर काहींनी आपल्या पराक्रमाने साम्राज्य विस्तारले. परंतु जनतेच्या मनावर राज्य करणारे आणि प्रजेला आपल्या कुटुंबाप्रमाणे जपणारे राज्यकर्ते फार थोडे होऊन गेले. अशा मोजक्या लोककल्याणकारी राज्यकर्त्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. सत्ता, संपत्ती आणि वैभवाच्या शिखरावर असूनही ज्यांनी जनतेच्या सुख-दुःखाला आपल्या जीवनाचे ध्येय मानले, अशा अहिल्यादेवी आजही लोकस्मृतीत 'मातोश्री' म्हणून जिवंत आहेत. अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, दूरदृष्टी आणि लोककल्याण यांचे अद्वितीय उदाहरण होय. चौंडी या छोट्याशा गावात जन्मलेल्या या कन्येने पुढे माळवा प्रदेशाच्या राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळली. पती खंडेराव होळकर यांचे युद्धात निधन झाल्यानंतर तत्कालीन समाजरचनेनुसार त्यांच्यावर सती जाण्याचा दबाव होता. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. हा निर्णय केवळ एका स्त्रीचे जीवन वाचवणारा नव्हता, तर भारतीय इतिहासाला एक आदर्श शासिका देणारा ठरला.

मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यादेवींनी प्रशासन, अर्थकारण, सैनिकी व्यवस्थापन आणि न्यायदान यांचे बारकावे आत्मसात केले. त्यामुळे सासरे आणि पुत्राच्या निधनानंतर राज्यावर संकटाचे ढग दाटून आले असतानाही त्यांनी धैर्याने नेतृत्व स्वीकारले. अनेक सरदार आणि राजकीय प्रतिस्पर्ध्यांचा विरोध झुगारून त्यांनी माळव्याच्या गादीवर बसण्याचा अधिकार मिळवला. त्या काळात स्त्रीने राज्यकारभार करणे हेच अनेकांना मान्य नव्हते; मात्र आपल्या बुद्धिमत्ता, कार्यक्षमता आणि धाडसाच्या बळावर त्यांनी सर्व विरोधकांना शांत केले. अहिल्यादेवींच्या राज्यकारभारातील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांची प्रजावत्सलता. आजच्या लोकशाहीतही अनेकदा सामान्य नागरिकाला सत्तेच्या दारापर्यंत पोहोचणे कठीण जाते. परंतु अहिल्यादेवी दररोज खुला दरबार भरवत असत. कोणताही प्रजाजन थेट त्यांच्यापर्यंत आपली व्यथा मांडू शकत असे. न्याय मिळवण्यासाठी त्याला दलालांची किंवा शिफारशींची गरज नव्हती. न्याय हा त्यांच्या राज्याचा आत्मा होता.

त्यांच्या न्यायप्रियतेच्या अनेक कथा आजही लोकपरंपरेत सांगितल्या जातात. सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्यालाही शिक्षा देण्यात आली. सत्ता, नातेसंबंध किंवा पद यापेक्षा न्याय मोठा आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. आजच्या काळात सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या लोकांवर कारवाई करण्यास प्रशासन अनेकदा टाळाटाळ करते. अशा वेळी अहिल्यादेवींची न्यायनिष्ठा अधिकच प्रेरणादायी वाटते. अहिल्यादेवींनी राज्यकारभार केवळ महसूल गोळा करण्यापुरता मर्यादित ठेवला नाही. त्यांनी शेतकरी, व्यापारी, कारागीर आणि सामान्य जनतेच्या विकासाला प्राधान्य दिले. शेतकरी सुखी तर राज्य सुखी हा विचार त्यांनी प्रत्यक्षात उतरविला. शेतकऱ्यांवरील अन्यायकारक कर कमी केले. तलाव, विहिरी आणि पाणीपुरवठ्याच्या सुविधा निर्माण केल्या. दुष्काळाशी मुकाबला करण्यासाठी जलसंधारणाची कामे केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी गोपालनाला प्रोत्साहन दिले.

त्यांच्या काळात व्यापार आणि उद्योगधंद्यांनाही उत्तेजन मिळाले. महेश्वर हे शहर त्यांनी केवळ राजधानी म्हणून विकसित केले नाही, तर ते वस्त्रोद्योग, संस्कृती आणि विद्वत्तेचे केंद्र बनवले. आज प्रसिद्ध असलेल्या महेश्वरी साड्यांच्या परंपरेला चालना देण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. रोजगारनिर्मिती आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आधुनिक आर्थिक धोरणांनाही मार्गदर्शक ठरावेत असे आहेत. अहिल्यादेवींची दूरदृष्टी केवळ अर्थकारणापुरती मर्यादित नव्हती. सामाजिक सुधारणांच्या बाबतीतही त्या आपल्या काळाच्या कितीतरी पुढे होत्या. सतीप्रथेच्या विरोधात त्यांनी लोकजागृती केली. धर्मग्रंथांचा आधार



घेऊन सतीप्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नसल्याचे लोकांना पटवून दिले. विधवांच्या हक्कांचे संरक्षण केले. दत्तक घेण्याच्या प्रक्रियेत अडथळे आणणाऱ्या अधिकाऱ्यांना फटकारले. स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि स्वावलंबनासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.

आज स्त्रीसक्षमीकरणाची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असली तरी अठराव्या शतकात एका स्त्रीने इतक्या व्यापक सामाजिक सुधारणा करणे ही अभूतपूर्व बाब होती. त्यामुळेच अहिल्यादेवी या केवळ राजमाता नव्हत्या, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या अग्रदूत होत्या. ज्ञान, संस्कृती आणि शिक्षण यांच्याबाबतही त्यांची भूमिका अत्यंत सकारात्मक होती. अनेक विद्वान, पंडित, शास्त्री, कीर्तनकार, वैद्य आणि अभ्यासकांना त्यांनी आश्रय दिला. हस्तलिखित ग्रंथांचे जतन आणि निर्मिती यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शाळा सुरू केल्या. ज्ञान ही समाजाच्या प्रगतीची खरी शक्ती आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती.

धर्माविषयी त्यांची श्रद्धा खोल होती; मात्र ती अंधश्रद्धा नव्हती. त्यांनी भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांचा विकास केला. काशी, सोमनाथ, द्वारका, रामेश्वर, हरिद्वार, उज्जैन, अयोध्या यांसारख्या ठिकाणी घाट, मंदिरे, धर्मशाळा आणि यात्रेकरूंसाठी सुविधा उभारल्या. परंतु धर्माच्या नावाखाली भेदभाव किंवा दडपशाही त्यांनी कधीच स्वीकारली नाही. त्यांचा धर्म म्हणजे लोकसेवा आणि मानवतेची उपासना होता. अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक उल्लेखनीय पैलू म्हणजे त्यांची राजकीय दूरदृष्टी. ब्रिटिशांच्या वाढत्या प्रभावाविषयी त्यांनी वेळेआधीच इशारा दिला होता. पेशव्यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी इंग्रजांशी संबंध ठेवताना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला. अस्वलाच्या मिठीची उपमा देत त्यांनी इंग्रजांच्या विस्तारवादी धोरणाचे अचूक विश्लेषण केले. पुढील इतिहास पाहता त्यांच्या या निरीक्षणाची प्रगल्भता अधोरेखित होते.

समाजातील वंचित आणि आदिवासी घटकांबद्दलही त्यांची भूमिका संवेदनशील होती. भिल्ल आणि गोंड जमातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. रोजगार, जमीन आणि सैन्यात स्थान देऊन त्यांना सन्मानाचे जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली. गुन्हेगारीकडे वळलेल्या लोकांना शिक्षा देतानाच त्यांचे पुनर्वसन करण्याची मानवी दृष्टी त्यांनी दाखवून दिली. आजच्या काळात शासन आणि प्रशासन यांच्यावर अनेकदा लोकांपासून दूर असल्याचा आरोप होतो. विकासाच्या नावाखाली सामान्य माणसाच्या समस्या दुर्लक्षित होतात. अशा वेळी अहिल्यादेवींचे शासन मॉडेल अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांनी विकास, न्याय, शिक्षण, सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता आणि लोककल्याण यांचा सुंदर समन्वय साधला होता. म्हणूनच त्यांचा तीस वर्षांचा राज्यकाल हा माळव्याच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.

अहिल्यादेवींच्या कार्याची दखल केवळ भारतातच नव्हे तर परदेशी इतिहासकारांनीही घेतली. अनेक इंग्रजी लेखकांनी त्यांची तुलना रशियाच्या कॅथरीन द ग्रेट आणि इंग्लंडच्या राणी एलिझाबेथ यांच्याशी केली आहे. परंतु वस्तुतः अहिल्यादेवींचे व्यक्तिमत्त्व या सर्व तुलनांच्या पलीकडचे आहे. कारण त्यांची महानता केवळ राज्यकारभारात नव्हती, तर जनतेच्या हृदयात निर्माण झालेल्या विश्वासात होती. आजही इंदूर विमानतळ, देवी अहिल्या विश्वविद्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांसारख्या संस्थांमधून त्यांच्या कार्याची आठवण जिवंत ठेवली जाते. मात्र त्यांना खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या विचारांचे अनुकरण होय. जनतेच्या कल्याणाला प्राधान्य देणारे प्रशासन, न्यायाला सर्वोच्च स्थान, स्त्री-सन्मान, शिक्षणाचा प्रसार आणि सर्वसमावेशक विकास यांची अंमलबजावणी करण्यातच त्यांचे स्मरण सार्थ ठरेल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ इतिहासातील एक महान शासिका नव्हत्या; त्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचा जिवंत आदर्श होत्या. सत्तेला सेवेत रूपांतरित करणाऱ्या, न्यायाला धर्म मानणाऱ्या आणि जनतेच्या सुखात स्वतःचे सुख शोधणाऱ्या या मातोश्रींचे जीवन आजच्या राज्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ आहे. म्हणूनच इतिहासाच्या पानांवर त्यांचे नाव केवळ एका राणीचे नसून, रयतेच्या सुखासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकमातेचे म्हणून सदैव अजरामर राहील. सत्ता ही जनसेवेसाठी असते, वैभवासाठी नव्हे; हे आपल्या कर्तृत्वातून जगाला दाखवून देणाऱ्या लोकमाता अहिल्यादेवींना कोटी कोटी प्रणाम. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

# बनावट आयुर्वेदिक औषधे आणि बोगस उपचार केंद्रांचा वाढता विळखा : जनतेच्या आरोग्याशी सुरू असलेला जीवघेणा खेळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राज्यात बनावट आयुर्वेदिक औषधांचा काळाबाजार आणि बोगस उपचार केंद्रांचा सुळसुळाट दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.अनेक ठिकाणी परवानगीशिवाय आयुर्वेदिक उपचार केंद्रे चालवले जात आहेत, तर काही ठिकाणी खोट्या व दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक आणि मानसिक फसवणूक केली जात आहे. नुकतीच राज्यभरातील सात जिल्ह्यांमध्ये १२ आयुर्वेदिक औषधविक्री आस्थापनांवर धडक कारवाई करून तब्बल ७३ लाख २४ हजार ६५६ रुपयांचा मिसब्रँडेड व आक्षेपार्ह जाहिराती असलेला औषधसाठा अन्न व औषध प्रशासन विभागाकडून जप्त करण्यात आला.

या कारवाईमुळे राज्यातील बनावट औषध व्यवसायाचे गंभीर वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणालाही प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. भ्रामक जाहिराती, अवैध औषध उत्पादन आणि बेकायदेशीर विक्रीविरोधातील कारवाई अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण केली जाईल.प्रशासनाची ही भूमिका महत्त्वाची असली तरी प्रत्यक्षात राज्यातील अनेक शहरांमध्ये आणि ग्रामीण आणि शहरी भागात ही अजूनही बोगस आयुर्वेदिक उपचार केंद्रे




खुलेआम सुरू असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. विशेष म्हणजे आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई शहरातही बनावट आयुर्वेदिक उपचार केंद्रांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असल्याचे अनेकदा समोर आले आहे. मुंबई शहर आणि उपनगराच्या अनेक भागांमध्ये तसेच गर्दीच्या बाजारपेठांमध्ये अनेक तथाकथित आयुर्वेदिक उपचार केंद्रे दवाखाने लोकांना हमीशीर उपचार देण्याच्या नावाखाली लुटत आहेत.काही केंद्रांवर कोणतीही वैद्यकीय पदवी नसलेले लोक स्वतःला डॉक्टर किंवा वैद्य म्हणून सादर करतात.मोठमोठे बॅनर, सोशल मीडियावरील जाहिराती आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातून कॅन्सर पूर्ण बरा, मधुमेह कायमचा नष्ट, किडनी विकारावर खात्रीशीर उपाय, गुडघे दुःखीपासून कायमची मुक्तता, लठ्ठपणा ७ दिवसांत कमी अशा प्रकारच्या भ्रामक जाहिराती करून लोकांना जाळ्यात ओढत आहेत. गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिक हे कमी खर्चात उपचार मिळतील या आशेने अनेक जण अशा आयुर्वेदिक उपचार केंद्रांकडे वळतात.मात्र प्रत्यक्षात त्यांच्याकडून हजारो, लाखो रुपये उकळले जातात. काही वेळा चुकीची बनावट औषधे दिल्यामुळे रुग्णांची प्रकृती आणखी बिघडते. अनेकांना गंभीर दुष्परिणामांना सामोरे जावे लागते.काही प्रकरणांमध्ये तर वेळेवर योग्य उपचार न मिळाल्याने रुग्णांचा जीव धोक्यात आल्याच्या घटनाही घडल्या आहेत. आजकाल सोशल मीडिया हे या बोगस व्यवसायाचे सर्वात मोठे माध्यम बनले आहे. फेसबुक, यूट्यूब, इंस्टाग्राम आणि विविध वेबसाईट्सवर आकर्षक व्हिडीओ व बनावट अनुभव दाखवून लोकांचा विश्वास संपादन केला जातो. काही जण खोटे रुग्ण उभे करून आम्ही पूर्ण बरे झालो अशा प्रतिक्रिया दाखवतात. यामुळे सर्वसामान्य लोक सहजपणे फसतात.विशेषतः गंभीर आजारांनी त्रस्त असलेले रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांची मानसिक अवस्था लक्षात घेऊन त्यांची फसवणूक केली जाते.

राज्यातील अनेक बोगस आयुर्वेदिक उपचार केंद्रांमध्ये औषधांची कोणतीही गुणवत्ता तपासणी होत नाही.उत्पादन कुठे तयार झाले, त्यात कोणते घटक आहेत, त्याचा शरीरावर काय परिणाम होईल याबाबत कोणतीही अधिकृत माहिती नसते. काही ठिकाणी तर बनावट लेबल लावून औषधे विकली जातात. अशा औषधांमुळे यकृत, मूत्रपिंड आणि हृदयाशी संबंधित गंभीर दुष्परिणाम होण्याची शक्यता असते.या वाढत्या प्रकारांमुळे केवळ आरोग्य व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत नाही, तर खऱ्या आयुर्वेद शास्त्राची प्रतिमाही मलिन होत आहे. आयुर्वेद ही भारताची प्राचीन आणि प्रभावी उपचार पद्धती मानली जाते.मात्र काही बोगस लोकांच्या गैरप्रकारांमुळे संपूर्ण आयुर्वेद व्यवस्थेबद्दल समाजात संशय निर्माण होत आहे. त्यामुळे अशा फसव्या आयुर्वेदिक व्यवसायांवर कठोर कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे.

प्रशासनाने केवळ अधूनमधून कारवाई करून थांबता कामा नये. नियमित तपासण्या, परवाना पडताळणी, ऑनलाईन जाहिरातींवर नियंत्रण आणि बोगस आयुर्वेदिक दवाखान्यांवर तातडीने गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे.तसेच नागरिकांनीही जागरूक राहणे तितकेच महत्त्वाचे आहे.कोणत्याही आयुर्वेदिक डॉक्टरकडे उपचार घेण्यापूर्वी त्यांची अधिकृत नोंदणी, वैद्यकीय पात्रता आणि औषधांचा परवाना तपासणे गरजेचे आहे. संशयास्पद जाहिराती आणि अवैध उपचार केंद्रांची माहिती प्रशासनाला देणे ही प्रत्येक नागरिकाची प्राथमिक जबाबदारी आहे. जनतेच्या जीवाशी खेळ करणाऱ्या बनावट औषध माफियांना वेळीच आळा घातला नाही तर भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.त्यामुळे सरकार, अन्न व औषध प्रशासन,आरोग्य विभाग आणि नागरिक यांनी एकत्रितपणे या बोगस साखळीविरोधात लढा उभारणे ही काळाची गरज बनली आहे.



**– केतन दत्ताराम भोज, घाटकोपर**
**सदस्य – मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई**
**मो – ८३६९५५४४१८**

# मुंबईचा समुद्रकिनारा नटणार हिरवाईने! कोस्टल रोड शेजारी ६० हजार झाडांची लागवड; रिलायन्स फाउंडेशन उभारणार 'अर्बन फॉरेस्ट'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईकरांचा प्रवास सुसाट आणि वेगवान करणाऱ्या 'मुंबई कोस्टल रोड' प्रकल्पाच्या माध्यमातून आता मुंबईला एक नवी ओळख मिळणार आहे. कोस्टल रोड प्रकल्प केवळ वाहतूक कोंडी फोडण्यापुरता मर्यादित न राहता, तो मुंबईकरांना निसर्गाच्या कुशीत घेऊन जाणारा ठरणार आहे. मुंबई महानगरपालिकेने या प्रकल्पांतर्गत समुद्रातून मिळवलेल्या विस्तीर्ण खुल्या जागेत तब्बल ६०,००० झाडे लावण्याची एक भव्य आणि पर्यावरणपूरक योजना हाती घेतली आहे. वरळी आणि ब्रीच कँडी या भागांमध्ये वृक्षारोपणाच्या कामाला आधीच सुरुवात झाली असून, येत्या पावसाळ्यापूर्वी सुमारे १५,००० झाडे लावण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट पालिकेने डोळ्यासमोर ठेवले आहे.

खुल्या जागांचे होणार नयनरम्य उद्यानांमध्ये रूपांतर

समुद्रातून भरणी घालून मिळवलेल्या (ीम्त्रग्स्) या जमिनीचे पुढील काही वर्षांत नयनरम्य हरित सार्वजनिक जागेत रूपांतर करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. मात्र, समुद्रकिनाऱ्यावरील आव्हानात्मक वातावरणात कोणती झाडे तग धरू शकतात, याचे सध्या व्यापक वैज्ञानिक परीक्षण केले जात आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण सुरू करण्यापूर्वी येथील मातीची सखोल चाचणी (एदग्त ऊेूग्हु) केली जात आहे. किनारपट्टीच्या खाऱ्या वाऱ्यांमध्ये आणि दमट हवामानात जी झाडे दीर्घकाळ जिवंत राहू शकतात, अशाच विशिष्ट प्रजातींची निवड या प्रकल्पासाठी केली जात आहे. एकूण १०.६ किलोमीटर लांबीच्या मुंबई कोस्टल रोड (दक्षिण) प्रकल्पामुळे समुद्रातून सुमारे १११ हेक्टर इतकी अफाट जमीन उपलब्ध झाली आहे. यापैकी केवळ ४० हेक्टर जमिनीचा वापर रस्ते, पूल आणि इंटरचेंज बांधण्यासाठी करण्यात आला आहे. तर उर्वरित सर्व म्हणजेच तब्बल ७१ हेक्टर जागा पूर्णपणे सार्वजनिक सुविधा आणि खुल्या उद्यानांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. या भागात भव्य उद्याने, थीम पार्क्स, 'अर्बन फॉरेस्ट', अत्याधुनिक सायकलिंग ट्रॅक आणि नागरिकांना फिरण्यासाठी सुंदर पादचारी मार्ग विकसित केले जाणार आहेत.

या हरित पट्ट्यामध्ये केवळ मोठी झाडेच नाही, तर संपूर्ण किनारपट्टीचे सौंदर्य अधिक खुलवण्यासाठी पालिकेने तब्बल २ लाख लहान झुडपे (एपीलें) लावण्याचेही नियोजन केले आहे. या भव्य प्रकल्पाला अखंडित आणि दर्जेदार रोपांचा पुरवठा व्हावा, म्हणून वरळी आणि ब्रीच कँडी येथे विशेष आधुनिक रोपवाटिका तयार केल्या जात आहेत. यातील वरळी येथील रोपवाटिका पूर्ण क्षमतेने सुरू झाली असून ब्रीच कँडी येथील सुविधाही लवकरच कार्यान्वित होईल. समुद्राच्या खाऱ्या आणि तीव्र वाऱ्यांमध्ये वनस्पतींचा विकास कसा होतो, याचे थेट प्रयोग सध्या येथे सुरू आहेत. समुद्रातून मिळवलेली ही मूळ जमीन वनस्पतींच्या आणि झाडांच्या वाढीसाठी योग्य बनवणे हे पालिकेच्या उद्यान विभागासमोर एक मोठे तांत्रिक आव्हान होते. ही जमीन खारट आणि खडकाळ असल्याने त्यावर वनस्पती रुजू शकत नव्हत्या. यासाठी सर्वप्रथम त्यावर ४०० मिमी जाडीचा मुरमाचा मजबूत थर देण्यात आला. त्यानंतर आता वनस्पतींच्या मुळांना योग्य पोषण मिळावे आणि झाडे वेगाने वाढावीत, यासाठी यावर सुपीक आणि दर्जेदार काळी माती पसरवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या संपूर्ण वृक्षारोपण आणि सुशोभीकरण प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीतून एकही रुपया खर्च केला जाणार नाही. 'रिलायन्स फाउंडेशन' (ींत्रहम इदल्ह्रदह) आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (एणीं) निधीतून हा कोट्यवधी रुपयांचा प्रकल्प पूर्णपणे राबवत आहे. या कोस्टल रोड गार्डन प्रकल्पाचा अधिकृत प्रस्ताव या वर्षाच्या सुरुवातीला मंजुरीसाठी मांडण्यात आला होता आणि पुढील २४ महिन्यांत हे संपूर्ण सुशोभीकरणाचे काम पूर्ण होईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या विस्तीर्ण हरित पट्ट्याव्यतिरिक्त, मुंबईकरांच्या विरंगुळ्यासाठी अनेक जागतिक दर्जाच्या क्रीडा आणि सांस्कृतिक सुविधा येथे दिल्या जाणार आहेत. प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिराच्या अगदी जवळ एक शांत आणि प्रसन्न 'अध्यात्मिक क्षेत्र' (एज्गीूलर्त ैंदहा) विकसित केले जाईल. तसेच, हाजी अली इंटरचेंजच्या खाली असलेल्या जागेचा कल्पक वापर करून मुलांसाठी आधुनिक खेळण्याची जागा, खुली मैदाने, आणि टेनिस व बॅडमिंटन कोर्ट यांसारख्या क्रीडा सुविधा उभारल्या जातील. हे काम पूर्ण झाल्यानंतर मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीवर नागरिकांना विरंगुळ्यासाठी एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे विस्तीर्ण पर्यटन स्थळ उपलब्ध होणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर तालुका पोलिसांची डिझेल चोरीच्या बाबतीत कारवाई; आठ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २६ मे च्या रात्री पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास तुंगत गावातील श्री विशाल भोसले यांचे १० चाकी ट्रक मधून एक जण ब्रेजा गाडीमध्ये डिझेलचे ड्रम ठेवून दुसरे दोन जण फायबरच्या पाईपच्या साह्याने ट्रक मधून डिझेल चोरी करून त्रिंब डिझेल चोरी केले. त्यानंतर ट्रकचा मालक विशाल भोसले यास संशय आल्यानंतर ब्रीजा गाडीचा पाठलाग केला. त्यानंतर ही गाडी गुरसाळे बायपासला आल्यानंतर त्या ठिकाणी समाधान घोटाळा यांच्या हॉटेल समोर असलेल्या गाडीच्या बाजूला लावून त्या ठिकाणी देखील ब्रीजा गाडीमधून दोघेजण खाली उतरून एक जण प्लास्टिकची पाईप येतील ट्रकच्या गाडीला लावून डिझेलचे टाकीतून डिझेल चोरी करत असताना आरडा ओरड केल्याने निघून दोघे पळून गेली आणि एका व्यक्तीला लोकांनी पाठलाग करून पंढरपूर तालुका पोलिसांना याची माहिती दिली. पंढरपूर तालुका पोलिसांनी सजल ठिकाणी जाऊन चोरी केलेली डिझेल ब्रेजा कार व तीन मोबाईल फोन असा एकूण तीन ड्रम डिझेल सह मुद्देमाल विकून किंमत रुपये आठ लाख ३५ हजार रुपये मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून ताब्यात घेतलेल्या असून आरोपी दत्तात्रेय महावितरण लोहार राहणार मोहोळ तालुका मोहोळ यांच्याविरुद्ध त्यांची इतर दोन साथीदार यांच्याविरुद्ध बी एम एस ॲक्ट कलम ३०३ प्रमाणे डिझेल चोरीता गुन्हा दाखल केले. आरोपी दत्तात्रय महारुद्र लोहार या सदर चोरीच्या तपासास कामी घेण्यात आलेली आहे व इतर पळून गेलेल्या दोन आरोपींना पंढरपूर तालुका पोलीस मोहोळ बहाद शोध घेत आहेत. मागील दोन महिन्यात गुरसाळे रोडवर डिझेल चोरीच्या अनेक घटना घडलेल्या होत्या. त्या बाबतीमध्ये सदर कारवाईतून आणखीन डिझेल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.



सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी. अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, शहाजी गोसावी, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, भारत भोसले, दत्तात्री तोंडले, विजू गायकवाड, पोलीस हवालदार जाडकर नितीन चौरे, सुजित उबाळे पोलीस हवालदार साळुंखे, संजय गुटाळ मंगेश रोकडे, पोलीस हवालदार योगीराज खिलारे, सुहास देशमुख, अभिमन्यू गरड यांच्या पथकाने केली आहे.

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण; टाकळीवाडी माळावरील रस्ता वळण ठरतय अपघाताचे कारण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी येथील माळावरील रस्त्यावरील धोकादायक वळण सध्या अपघातांचे प्रमुख कारण ठरत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या रस्त्यावरून दररोज दुचाकी, चारचाकी तसेच शेतीसाठी वापरण्यात येणारी वाहने ये-जा करत असतात. मात्र वळणावर पुरेशी दृष्यमानता नसल्याने वाहनचालकांना अंदाज घेणे कठीण जात आहे.

गेल्या काही महिन्यांत या ठिकाणी किरकोळ तसेच गंभीर स्वरूपाचे अपघात घडल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्यावर प्रकाशव्यवस्था नसल्याने धोका अधिक वाढत आहे.

विद्यार्थ्यांसह शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिक या रस्त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असतात.

# अंतरवाली सराटी पुन्हा रणसिंग; मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यासाठी मराठा आंदोलनाची प्रमुख नेते मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे पुन्हा एकदा आमरण उपोषणाला प्रारंभ केला आहे. या आंदोलनामुळे राज्यातील मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

मनोज जंगी पाटील यांनी सरकारकडे मराठा समाजाला आरक्षण, सगे सोयरे अंमलबजावणी सह विविध मागण्यांची पूर्तता करण्याची मागणी केली आहे. सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण न झाल्याचा आरोप करत त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे उपोषण स्थळी राज्यातील विविध भागातून मराठा समाजाचे कार्यकर्ते महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने दाखल होत असून आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करीत आहेत आंतरवाली सराटी परिसरात पोलीस बंदोबस्त ही वाढवण्यात आला आहे.

यावेळी बोलताना मनोज डांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी हे आंदोलन असून मागण्या मान्य होईपर्यंत संघर्ष सुरू राहील असा निर्धार व्यक्त केला.


या उपोषणाकडे राज्य सरकार व राजकीय पक्ष तसेच मराठा समाजाची लक्ष लागले असून पुढील काळात सरकारकडून कोणती भूमिका घेतली आहे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सोलापूर उपजिल्हाधिकारी यांना सम्यक विद्यार्थी आंदोलन वतीने विविध मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर उपजिल्हाधिकारी यांना सम्यक विद्यार्थी आंदोलन सोलापूर जिल्ह्याच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले,

NEET-UG २०२६ प्रश्नपत्रिका फुटी प्रकरण, शिक्षणातील भ्रष्टाचार व व्यापारीकरणाविरोधात आज संपूर्ण महाराष्ट्रात सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने धरने आंदोलन व निवेदन देण्यात येत आहे,



छएएढ-णत्रृ २०२६ प्रश्नपत्रिका फुटी प्रकरण, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार तसेच शिक्षणाच्या व्यापारीकरणाविरोधात सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन सोलापूर निवासीय उपजिल्हाधिकारी सर यांना देण्यात आले.

यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे, साहिल कांबळे, सचिन मुदीनकेरी आदीसह विद्यार्थी उपस्थित होते.

# अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समीती जिल्हा उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर चव्हाण यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी कळंब तालुक्यातील कोथळ येथील ज्ञानेश्वर चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



लातुर येथे संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर यांच्या हस्ते दि.२८ मे २०२६ रोजी सदरील नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्तीपत्रात नमूद केल्यानुसार, संघटनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या कडुन अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या निवडी वेळी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समीती चे जिल्हाध्यक्ष विनोद सावंत, विवेक पवार उपस्थित होते. सदरील निवडी बद्दल ज्ञानेश्वर चव्हाण यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# मुंबईत आता बांधकाम मंजुरीसाठी एआय आधारित प्रणाली, मुख्यमंत्र्यांनी केले लोकार्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई महानगरपालिकेचं नागरी प्रशासन अधिक वेगवान करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेनं एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. महानगरपालिकेतर्फे 'ण्न्ूऊैग्ह' ही भारतातील पहिली आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आधारित बांधकाम इमारत परवानगी प्रणाली सुरू करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रणालीचं लोकार्पण करण्यात आलं. यावेळी, महापौर रितू तावडे व आयुक्त अश्विनी भिडे उपस्थित होत्या.

विकासकांसाठी ही प्रणाली महत्त्वाची ठरणार : या एआय प्रणालीमुळं बांधकाम प्रस्तावांची सादरीकरणापूर्वीच तपासणी करता येणार आहे. यामुळं व्यवसायिकांना प्रस्तावातील त्रुटी, अपूर्ण कागदपत्रे नियम भंग किंवा आवश्यक ना हरकत प्रमाणपत्रे याची माहिती सुरुवातीलाच मिळणार आहे पर्यायी मोठा वेळेची बचत यामुळे होणार आहे. मंजुरी प्रक्रियेत होणारा विलंब यामुळं कमी होणार आहे. सध्या बांधकाम इमारत प्रस्ताव सादर केल्यानंतर अनेकदा ते आक्षेपांसह परत पाठवले जातात.

मात्र, आता आधीच या सर्व आक्षेपांची माहिती व्यावसायिकांना मिळणार असल्यामुळं त्यांचा मोठा वेळ संपूर्ण प्रक्रियेत वाचणार आहे. विकासकांसाठी ही प्रणाली महत्त्वाची ठरणार आहे. पूर्वी प्रस्तावातील त्रुटींमुळं वारंवार प्रस्ताव दुरुस्त करावे लागायचे. मात्र आता या अनेक प्रक्रिया थेट डिजिटल होणार आहेत. त्यामुळं मनुष्यबळ आणि खर्च यामध्ये बचत होणार आहे.

बांधकाम परवानगी जलद मिळण्यास मदत होणार : एआयच्या आधारित माहिती विषणामुळे रस्ते, पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी प्रणाली, वाहतूक व्यवस्थापन आणि इतर नागरी पायाभूत सुविधांचे अधिक अचूक नियोजन करण्यासाठी मदत होणार आहे. भविष्यातील नागरी विस्तार आणि पुनर्विकास प्रकल्पांसाठीही या प्रणालीमुळं अधिक सक्षम नियोजन करण्यास मदत होणार आहे. या नव्या प्रणालीचा सर्वसामान्य मुंबईकरांना थेट फायदा होणार आहे.

बांधकाम परवानगी जलद मिळण्यास मदत होणार आहे. गृहनिर्माण आणि पुनर्विकास प्रकल्पांची अंमलबजावणी वेगवान होणार आहे. या विषयी बोलताना विकास नियोजन विभागाचे प्रमुख अभियंता सुनील राठोड म्हणाले की, ''मुंबईत महानगरपालिकेच्या नवीन एआय प्रणालीमुळे सर्वसामान्य मुंबईकरांना थेट फायदा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याचं लोकार्पण केलं आहे. यामुळं मुंबईकरांचा मोठा वेळ वाचणार आहे. आयुक्त अश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनात हे काम पूर्ण करण्यात आलं आहे.''

### ऐनवेळी भाजपचे धक्का तंत्राची चर्चा

# सोलापूर विधान परिषदेत भाजपच्या सस्पेन्स कायम परिचारकांचे नाव आघाडीवर आहे पण राऊत ही शर्यतीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : संपूर्ण सोलापूर जिल्ह्याची लक्ष लागून राहिलेले स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगले तापले आहे. भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी कोणाला मिळणार याबाबत विविध तर्क वितरकांना उदान आले असून माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे नाव आघाडीवर मानले जात असल्याची जोरदार चर्चा व राजकीय वर्तुळात सुरू आहे. भाजपच्या संभाव्य उमेदवारामध्ये प्रशांत परिचारक यांच्यासह आणखी काही नावाची ही चर्चा सुरू आहे असली तरी पक्षश्रेष्ठीतील तुमचा सोलापूर जिल्ह्याचा अनुभव आणि त्यांचे राजकीय समीकरणे लक्षात घेता पारडे जड मानले जात आहे. दरम्यान माजी आमदार राजेंद्र राऊत यांचेही नाव या शर्यतीत चर्चेत आले आहे. बार्शी तालुक्यातील सहा जिल्हा परिषदांनी १२ पंचायत समिती अशा एकूण १८ जागांवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजयी करून अन्य त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावणीचे मानले जात आहे त्यामुळे पक्षसृष्टीकडून त्यांच्या नावाची ही गांभीर्याने विचार होत असलेली चर्चा आहे. विशेष म्हणजे त्यांनी उमेदवारी अर्ज लिहिल्याने राजकीय हालचालींना आणखी वेग आला आहे.





राजकीय विश्लेषणाच्या मते प्रशांतराव परिचारक यांचे नाव आघाडीवर असले आणि पक्षातील अनेक कार्यकर्त्याकडून त्यांच्याच उमेदवारीची अपेक्षा व्यक्त होत असली तरी भाजपच्या निर्णय प्रक्रियेत अनेकदा शेवटच्या क्षणी मोठे बदल झालेले पहावयास मिळाले आहेत. त्यामुळे ऐनवेळी एखादी नाव किंवा अनुपेक्षित नाव पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही याच ५०० मेंबर सोलापूर जिल्ह्यातील भाजप कार्यकर्ते व स्थानिक स्वराज्य संस्थेची सदस्य आणि राजकीय निरीक्षक यांची लक्ष आता दिल्ली आणि मुंबईतील प्रक्षस सिस्टीमच्या अंतिम निर्णयाकडे लागले उमेदवारीचे अधिकृत घोषणा होतात जिल्ह्यातील राजकीय समीकरणे नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीमुळे सोलापूरचे राजकारण तापले व भाजपकडून प्रशांत व परिचयांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा.

बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी बार्शीत अकरापैकी १८ जागा जिंकून दिल्याने त्यांच्याही नावाची जोरदार चर्चा पोचलेल्या नंतर राजकीय हालचालींना वेग व भाजपच्या धक्का तंत्रामुळे ऐनवेळी नवीन नाव समोर येण्याची शक्यता अधिकृत घोषणाकडे संपूर्ण जिल्ह्याची लक्ष.

# भिवंडी महसूल विभागाचे 'आधारवड' भगवान पाटील सेवानिवृत्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील महसूल विभागातील ज्येष्ठ, प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष सहकारी भगवान सावळाराम पाटील (पाटील तात्या) हे दीर्घ शासकीय सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय सेवेला सलाम करण्यासाठी महसूल विभागाच्या वतीने विशेष निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत भावनिक, आपुलकीपूर्ण आणि कौटुंबिक वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला.



एका सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेल्या भगवान पाटील यांनी सन १९९३ मध्ये रोजगार हमी योजनेत (रोहयो) लिपिक म्हणून आपल्या शासकीय कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर महसूल विभागात तलाठी म्हणून कार्यरत होत त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला. तब्बल ३३ वर्षांच्या सेवाकाळात फेरफार नोंदी, शासकीय महसूल वसुली, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन तसेच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या व संवेदनशील जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. मधुमेहासारख्या आजाराचा सामना करत असतानाही त्यांनी आपल्या कर्तव्यात कधीही कसूर केली नाही. प्रत्येक जबाबदारी हसतमुखाने आणि प्रामाणिकपणे पार पाडत त्यांनी सहकाऱ्यांचा विश्वास संपादन केला. त्यांचा मनमिळावू स्वभाव, सर्वांची आपुलकीने विचारपूस करण्याची सवय आणि अडचणीच्या काळात सहकाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची वृत्ती यामुळे ते महसूल विभागातील कर्मचाऱ्यांसाठी 'आधारवड' ठरले होते, अशा भावना अनेक सहकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केल्या. या निरोप समारंभाचे अध्यक्षस्थान भिवंडीचे नायब तहसीलदार आदेश म्हात्रे यांनी भूषविले. आपल्या मनोगतात त्यांनी भगवान पाटील यांच्या प्रशासकीय कौशल्याचे, सेवाभावी वृत्तीचे आणि कर्तव्यनिष्ठेचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमास राज्य तलाठी संघाचे सरचिटणीस संतोष अगिवले, भिवंडी तालुका तलाठी संघाचे अध्यक्ष नरसुबाबा तुगावे, सचिव निलेश कांबेरे, ज्येष्ठ सहकारी सुधाकर कामडी, शैलेश भोजणे, रविंद्र काळे, गणेश पाटील, राठोड तात्या, मंगेश जाधव यांच्यासह महिला कर्मचारी व भगिनी उपस्थित होत्या. तसेच महसूल विभागातील चित्ते तात्या, रुपेश कारभारी तात्या, शिवराज शिंदे, सागर खुताडे, विकास खरात, चौधरी तात्या, जनार्दन शिंदे तात्या तसेच कोतवाल संघटनेचे अध्यक्ष पुरुषोत्तम केणे आणि विजय गायकवाड यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी भगवान पाटील यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाला सलाम करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. निरोपाच्या क्षणी अनेक सहकाऱ्यांच्या भावना अनावर झाल्या. उपस्थितांनी त्यांना भावपूर्ण निरोप देत त्यांच्या पुढील सेवानिवृत्त आयुष्यासाठी सुख, समृद्धी, समाधान आणि उत्तम आरोग्य लाभो, अशा मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# खिशातील ५०० ची नोट खरी की खोटी?

# आरबीआयच्या अहवालातील धक्कादायक आकडेवारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अर्थव्यवस्थेत देशातील सर्वाधिक मूल्याचे चलन असलेल्या ५०० रुपयांच्या नोटांचे प्रमाण आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ११.२ टक्क्यांनी वाढले आहे, अशी माहिती रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालातून समोर आली आहे. मात्र, याच काळात ५०० रुपयांच्या बनावट नोटा पकडण्याच्या प्रमाणात २० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.



रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, मार्च २०२६ अखेर ५०० रुपयांच्या नोटांची संख्या ७,०५,४८२ लाखांवर पोहोचली आहे, जी गेल्या वर्षी मार्च २०२५ मध्ये ६,३४,४५८ लाख इतकी होती. मूल्याच्या दृष्टीने विचार केल्यास, ५०० रुपयांच्या एकूण नोटांचे मूल्य ३१.७२ लाख कोटी रुपयांवरून वाढून ३५.२७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. सध्या बाजारात असलेल्या एकूण चलनामध्ये एकट्या ५०० रुपयांच्या नोटांचा वाटा तब्बल ८६ टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

संख्येच्या बाबतीत, एकूण चलनात ५०० रुपयांच्या नोटांचा वाटा ४१.२ टक्के असून त्यापाठोपाठ १० रुपयांच्या नोटांचा वाटा १६.१ टक्के आहे.

रोखीची मागणी कायम

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एकूण चलनी नोटांच्या मूल्यात ११.९ टक्के आणि संख्येत १०.५ टक्के वाढ झाली आहे. हे आकडे देशात रोख पैशांची (कॅश) मागणी अजूनही मोठ्या प्रमाणावर कायम असल्याचे दर्शवतात. दुसरीकडे, मे २०२३ मध्ये चलनातून बाद केलेल्या दोन हजार रुपयांच्या नोटा परत येण्याची प्रक्रिया या वर्षातही सुरू होती. घोषणा झाली तेव्हा बाजारात ३.५६ लाख कोटी रुपयांच्या दोन हजार रुपयांच्या नोटा चलनात होत्या, त्यापैकी ३१ मार्च २०२६ पर्यत ९८.४५ टक्के नोटा रिझर्व्ह बँकेकडे माघारी आल्या आहेत.

चलनी नोटा आणि नाण्यांची सद्यस्थिती (३१ मार्च २०२६ पर्यत)

– नाण्यांच्या प्रमाणात वाढ: वर्ष २०२५-२६ मध्ये नाण्यांचे एकूण मूल्य ११.४ टक्क्यांनी आणि संख्या ४.५ टक्क्यांनी वाढली आहे. एकूण नाण्यांमध्ये १ रुपया, २ रुपये आणि ५ रुपयांच्या नाण्यांचा वाटा संख्येत ८०.७ टक्के, तर मूल्याच्या बाबतीत ६०.२ टक्के आहे.

– १० रुपयांच्या नोटांची छपाई वाढली: रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार, लहान नोटांची मागणी वाढल्याने १० रुपयांच्या नोटांची छपाई १८,००० नोटांवरून थेट ४६,००० नोटांवर नेण्यात आली आहे. तर दुसरीकडे मोठ्या मूल्याच्या नोटांची छपाई कमी केली आहे. पाचशे रुपयांच्या नोटांची मागणी १.२ लाख नोटांवरून १.१ लाख नोटांवर आली आहे, तर २०० रुपयांच्या नोटांची छपाई ४०,००० वरून थेट १५,००० वर घसरली आहे.

– नोटांची छपाई कमी झाल्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या नोटा छापण्याचा एकूण खर्च कमालीचा कमी झाला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये छपाईवर ६,३७९ कोटी रुपये खर्च झाले होते, जे आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये घटून ४,८७५ कोटी रुपयांवर आले आहेत.

बनावट नोटांच्या प्रमाणात ५.७ टक्क्यांची वाढ

देशातील बँकिंग व्यवस्थेमध्ये बनावट नोटा पकडल्या जाण्याच्या प्रमाणात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ५.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. यामध्ये पाचशे आणि दोनशे रुपये मूल्याच्या बनावट नोटांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे समोर आले आहे, तर १०० रुपयांच्या बनावट नोटांचे प्रमाण घटले आहे.

वर्ष २०२५-२६ मध्ये बँकिंग प्रणालीत एकूण २,२९,७४६ बनावट नोटा सापडल्या, तर याआधीच्या आर्थिक वर्षात (२०२४-२५) हा आकडा २,१७,३९६ इतका होता. पोलिसांकडून किंवा इतर तपास यंत्रणांकडून जप्त करण्यात आलेल्या बनावट नोटांचा या आकड्यात समावेश नाही.

पाचशेशी नोट स्वीकारताना काय वैशिष्ट्यांकडे लक्ष द्यावे

-नोट प्रकाशात धरल्यावर '५००' असा वॉटरमार्क आणि महात्मा गांधींची प्रतिमा दिसते.

-सुरक्षा धाग्यावर 'भारत', 'ठइख' आणि '५००' असे लिहिलेले असते. नोट हलवली की या धाग्याचा रंग हिरव्या रंगातून निळा दिसतो.

-नोटेच्या उजव्या बाजूला लहान आकारात '५००' लिहिलेले असते.

-दृष्टिहीनांसाठी महात्मा गांधींची प्रतिमा, अशोक स्तंभ आणि ओळख चिन्ह उभट स्वरूपात असतात.

– क्रमांक पॅनेलमध्ये डावीकडून उजवीकडे अंकांचा आकार वाढत जातो.

-नोटेचा मूळ रंग दगडी करडा असतो.

-नोट ळ% तुए मध्ये तपासल्यास काही सुरक्षा चिन्हे चमकताना दिसतात.


-खरी आणि बनावट नोट ओळखताना कागदाचा दर्जा, छपाईची स्पष्टता आणि उभट छपाई यांकडे विशेष लक्ष द्यावे.

---

# 'मराठा आरक्षणाबाबत आढावा घेऊन अडचणी सोडवणार' ; मंत्री विखे पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलन करण्याचा इशारा दिला. त्यानंतर सरकारच्या वतीने वेगवेगळे नेते त्यांच्या भेटीसाठी जात आहेत. राज्याचे मंत्री तथा भाजपा नेते राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड यांनी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तत्पूर्वी त्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात जाऊन आतापर्यंत जात प्रमाणपत्राबाबत आढावा घेतला. त्यावेळी राधाकृष्ण विखे पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आतापर्यंत प्रमाणपत्र किती दिले? काय काय कार्यवाही केली? त्याची माहिती दिली. जसे अर्ज येतील तशी



कार्यवाही सुरू आहे. त्यामध्ये सुधारणा सुरू आहेत. जिथे हलगर्जीपणा होत आहे तिथे कारवाईच्या सूचना दिलेल्या आहेत. अडचणी येत आहेत त्या अडचणी दूर करण्याच्या सूचना दिल्या असून, सुधारणा करून पुन्हा काम जोराने सुरू करणार आहोत, अशी माहिती त्यांनी दिली.

समिती गठित करण्याआधीच अनेक अर्ज - ''लोक अर्ज करत नाहीत, असं म्हणलं जात आहे. त्याच्याशी मी सहमत नाही. कारण, आपण समिती स्थापन केली तेव्हा लोकांना गावोगावी जाऊन सूचना केल्या होत्या. दवंडी देखील दिली होती. ग्रामसभेतही प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यासाठी विनंती केली आहे. समिती गठन होण्याच्या अगोदर अडीच लाख दाखले दिले गेले आहेत. ज्या जुन्या लिपी आहेत तिथे अडचण येत आहेत. हैदराबाद गॅझेटमध्ये सगळ्यात मोठी समस्या आहे ती म्हणजे तिथे नंबर आहेत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये आणि अजून काही ठिकाणी नावाने नोंदी आहेत आणि आपल्याला नंबरनुसार नोंद घ्यायच्या सांगितले आहे. आता त्यामध्ये आपण बदल करत आहेत,'' अशी माहिती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. हैदराबाद गॅझेट्सनुसार, ६ महिन्यात ६१ हजार दाखले आतापर्यंत दिले आहेत. हैदराबाद गॅझेट्समध्ये फक्त नंबर आहे. त्यासाठी पुढील कार्यवाहीसाठी प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी सांगितले.

समाधान होईल - ''आतापर्यंत काय काय कार्यवाही करण्यात आली आणि वस्तुनिष्ठ माहिती देण्यात यावी, असं विभागीय आयुक्तांना सांगितले आहे. त्यामुळे भेट घेण्यासाठी आलो आहे. काही ठिकाणी अधिकाऱ्यांविषयी तक्रारी आहेत. काही ठिकाणी व्हॅलिडीटी असूनही दाखले दिले गेले नाहीत. अशा तक्रारी होत्या. त्याचा आढावा आमदार प्रसाद लाड यांच्याबरोबर घेतला. मनोज जरांगे पाटील यांना उपोषणाचा अधिकार आहे. त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले, आमच्या चर्चेनंतर ते समाधानी होतील,'' अशी अपेक्षा राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

''जरांगे पाटील यांची पत्रकार परिषद पाहिली. त्यांनी मला भावनिक आवाहन केले. त्यांची इच्छा होती की, समितीचे अध्यक्ष यांच्यासोबत चर्चा करायची. त्यामुळे आम्ही सोबत आलो. त्यांनी आमच्या आवाहनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. मराठा समाजाचा कार्यकर्ता म्हणूनच मी आवाहन केले आहे,'' अशी प्रतिक्रिया प्रसाद लाड यांनी दिली.

---

# टीसीएस अत्याचार प्रकरणी एसआयटीचा ॲक्शन प्लॅन; आठ गुन्ह्यांसाठी आठ स्वतंत्र आरोपपत्र दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक अत्याचार, विनयभंग, धर्मांतराचा प्रयत्न, धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात दाखल आठ गुन्ह्यांचे आठ आरोपपत्र नाशिक सत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. एसआयटीचा हा अत्यंत मोठा ॲक्शन प्लॅन मानला जातोय. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक त्यांच्या सूचनानुसार तपासाकरिता एसआयटी पथक स्थापन केलं आहे. याआधी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याचे १५०० पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

नाशिकच्या नामांकित टीसीएस कंपनीतील कॉर्पोरेट जिहाद प्रकरणात मुंबई नाका पोलीस ठाण्यात आठ गुन्हे दाखल झाले. तर देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल करण्यात आला होता. यामध्ये कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचा लैगिंक अत्याचार, विनयभंग, धार्मिक भावना दुखावणे आणि धर्मांतराचा प्रयत्न अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल आहे. गुन्ह्याची व्याप्ती बघता नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी एसआयटीची स्थापना केली आहे. या सर्व गुन्ह्यात पोलिसांनी प्रत्येक गुन्ह्यासाठी आरोपींची पोलीस कोठडी घेत सखोल चौकशी केली. या गुन्ह्यात सर्व संशयितांच्या विरोधात पीडितांनी आणि साक्षीदारांनी दिलेली साक्ष आणि पुराव्याच्या आधारे न्यायालयानं सर्व संशयितांचे जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. सध्या सर्व संशयित मध्यवर्ती कारागृहात आहेत.

---

# गोळीबार केला अन् कोयत्याने गळे चिरले, एकाच ठिकाणी ६ जणांची निर्घृणपणे हत्या, सामूहिक हत्याकांडाने गाव हादरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्याला लागून असलेल्या कर्नाटकमधून एक धक्कादायक आणि मन विचलित करणारी घटना समोर आली आहे. विजयपूर जिल्ह्यातील गोविंदपूर भागामध्ये ६ जणांची हत्या करण्यात आली आहे. गोळीबार आणि गळा चिरून हत्या करण्यात आली आहे. जमिनीच्या वादातून ही घटना घडली असल्याचं सांगितलं जात आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजयपूर जिल्ह्यातील चडचाण तालुक्यातील गोविंदपूर गावात शुक्रवारी सायंकाळी ही भीषण घटना घडली. या घटनेत सहा जणांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याने संपूर्ण भिमातीर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गोविंदपूर गावात निराळे आणि गुळगी (गोलगी) कुटुंबांमध्ये अनेक दिवसांपासून जमिनीच्या वादावरून संघर्ष सुरू होता. या जुन्या वैमनस्यातूनच हा रक्तरंजित हल्ला झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

अधिक माहितीनुसार, अज्ञात हल्लेखोरांनी गावात येऊन थेट गोळीबार केला. या थरारक हल्ल्यात सहाजणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये रेवणसिद्धप्पा निराळे, दुंडप्पा रेवणसिद्धप्पा निराळे, शिवपुत्र रेवणसिद्धप्पा निराळे, चंद्रशेखर निराळे, शब्बीर अत्तार यांच्यासह आणखी एका व्यक्तीचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेनंतर गावात तणावपूर्ण शांतता असून, सीमाभागातील नागरिकांमध्ये मोठी भीती पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचा मोठा फौजफाटा गावात दाखल झाला असून, परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथकं तयार करण्यात आली आहेत. या दुहेरी नव्हे तर सामूहिक हत्याकांडामुळे विजयपूर जिल्हा हादरला असून, भिमातीर परिसरात पुन्हा एकदा रक्तपाताची पुनरावृत्ती झाल्याची चर्चा सुरू आहे.

---

# पंकज भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त पडघे येथे ९३ गुणवंतांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर व संकेत भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त लावण्या फाउंडेशनच्या वतीने पडघे येथे रविवारी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. वाढदिवसाचा खर्च टाळून गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याचा स्तुत्य उपक्रम यंदा सलग तिसऱ्या वर्षी राबवण्यात आला. यावर्षी दहावी-बारावी व इतर परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याचे पंकज भोईर यांनी ठरवले. त्यासाठी त्यांनी सलग तीन दिवस व्हॉट्सॲप स्टेटसच्या माध्यमातून नावनोंदणीचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत पडघे व परिसरातील ९३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



सर्व गुणवंतांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शैलेश बिडवी व संजय पटेल उपस्थित होते. यावेळी संदीप ठाकरे, नवनाथ वाघेरे, अनिल शेलार, जनार्दन ठाकरे, शरद जाधव, एकनाथ घोडविंदे, बाळाराम भोईर, विशाल शेलार, योगेश घोडविंदे, समृद्धी ठाकरे, रोहिणी पाटील, कविता भोईर, जयवंत पाटील, एकनाथ सपाट आदी मान्यवर उपस्थित होते. वाढदिवसाचा जल्लोष करण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडली पाहिजे. त्यातून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळते, असे मत पंकज भोईर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सूरज शेलार, सूरज जाधव, सानिका भोईर व मोनाली भोईर यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन पंकज भोईर यांनी केले. शारदा क्लासेस तसेच उपस्थित सर्व विद्यार्थी, पालक व मान्यवरांचे लावण्या फाउंडेशनच्या वतीने आभार मानण्यात आले.

---

**प्रवाशांची मागणी : ४-५ तास होतात उशिरा, प्रवाशांच्या जिवासी खेळ**

# गोंदिया वरुन गोंदिया बल्लरशाह रेल्वे वेळवर सोडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/ बाराभाटी : अनेक वर्षांपासून गोंदिया ते बल्लरशाह ही प्रवासी रेल्वे धावत आहेत. परंतु मे महिन्यात संपूर्ण महीना ही रेल्वे ४-५ तास अशी खुप उशिर करायची यामुळे प्रवाशांना अतिशय त्रास सहन करावा आजही लागत आहे. ही समस्या तातडीने सोडवुन नेहमी असणारी वेळ याच वेळेवर दररोज सोडावी. अशी मागणी प्रवासी करीत आहेत. म्हणून गोंदिया वरुन गोंदिया बल्लरशाह रेल्वे वेळवर सोडा.






गोंदिया बल्लरशाह या मार्गावर तब्बल दिवसातून ४ रेल्वे धावत असतात. तसेच बल्लरशाह वरुन गोंदियाकडे ४ गाड्या धावत आहेत. परंतु या मार्गावर दररोजच माल वाहून नेणाऱ्या गाड्या आधी पास करतात. तसेच सुपरफास्ट एक्सप्रेस या गाड्या सुध्दा आधी पास करता असतात. यामुळे आणखीन उशिरा लोकल गाडी मुद्दाम उशिरा सोडतात. हे सबंधित विभागाचे चुकीचे आहे.

लोकल पॅसेंजर गाड्या ह्या वेळेवर सोडायला हवी. जेणेकरून प्रवास करणारे प्रवासी हे आपले काम पूर्ण करतील. कारण कर्मचारी, शिक्षक, व्यवसायीक, विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, धंदेवाईक यांची कामात फारच बदल होतो. याला जबाबदार रेल्वे विभाग आहे.

मालगाडी व सुपरफास्ट एक्सप्रेस ह्या नागपूर मार्गाने वळवा.

मालगाडी व सुपरफास्ट एक्सप्रेस अशा गाड्या या नागपूर मार्गाने वळवून सामान्य नागरिकांचे वेळ बचत करण्यासाठी मदत होईल. सदर रेल्वे ही सेवा देण्यासाठी शासनाने सुरू केली आहे. तर सेवा न देता या मार्गावर उशिरा सोडण्यचा काम करत असून आपले मनमर्जीप्रमाणे काम करताना रेल्वे कर्मचारी दिसतात.

**लोहरुळाचे काम तातडीने करा.**

सदर मार्गावर लोहरुळाचे काम हे संथ गतीने सुरू केले जात आहे. वेगवान काम करत नसल्याने आणखी रेल्वे प्रवासी यांना मोठाच त्रास सहन करावा लागत आहे.

**४-५ तास उशीर करु नका.**

गोंदिया बल्लरशाह तसेच बल्लरशाह व गोंदिया ह्या प्रवासी रेल्वे अतिशय उशिरा करत असतात. हे म्हणजे प्रवाशांच्या जिवासी खेळ करणे असेच आहे. वेळेवर सोडल्या रेल्वे तर उशीर होतच नाही.

---

# तटकरे आणि पार्थ पवारांसोबत झालेल्या कथित वादावर भुजबळांनी केले भाष्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत सुनील तटकरे आणि छगन भुजबळ यांच्यात वाद झाल्याचं वृत्त समोर आलं होतं. दरम्यान भुजबळ यांनी यावर भाष्य केलं आहे. छगन भुजबळ यांनी कोणताही वाद झाला नसल्याचं सांगत दावे फेटाळून लावले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी कोणताही वाद झाला नसल्याचं सांगितलं.

कोणताही वाद झालेला नाही. कोण जरा जास्त बोललं की लवकर आटप म्हणतो तसंच झालं असं छगन भुजबळांनी सांगितलं. कंत्राटावरुन (टेंडर) पार्थ पवार यांच्यासोबत जोरदार खडाजंगी झाल्यासंदर्भात ते म्हणाले की, ''सगळं ऑनलाइन आहे. कोर्टाची स्थगिती आहे. कॅबिनेटने दोन वेळा मंजूर केलं आहे. मुख्य सचिवांनी चार बैठका घेतल्या आहेत. ऑनलाइन काम सुरु झालं आहे. कोण कशासाठी वाद घालणार? तुम्ही आपलं कोणी सांगितलं की लावून टाकता''.

सुनील तटकरे यांनी यावेळी सांगितलं की, ''विधानपरिषदेच्या जागांबद्दल आमची चर्चा झाली आहे. महायुतीमध्ये उद्यापर्यत जागांचा अंतिम निर्णय होईल, त्यानंतर आम्ही आमच्या हक्काच्या जागा जाहीर करू. आम्ही महायुती म्हणून एकत्रच ही निवडणूक लढवणार आहोत. प्रत्येक पक्षाला आपल्या हक्काच्या जागा मागण्याचा पूर्ण अधिकार आहे. पालकमंत्र्यांबाबत कोणतीही प्रस्ताव नाही''.

''कोअर कमिटीच्या बैठकीला सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि सर्व नेते उपस्थित होते. १७ जागांवर लढण्यासंदर्भात एकमत झालं आहे. त्यासंदर्भात चर्चा सुरु आहे. उद्या दुपारपर्यंत कोण कोणत्या जागांवर लढणार हे स्पष्ट होईल. राष्ट्रवादीला किती जागा हव्यात यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना सांगितलं आहे. १ तारखेला अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याची आम्हाला जाणीव आहे. उद्या दुपारपर्यंत निर्णय होईल. त्यानतर आम्ही उमेदवाराची निर्णय घेणार आहोत''. ''महायुती म्हणून निवडणुकीला सामोरे जाणार असल्याने कोण कोणती जागा लढेल हे स्पष्ट झाल्यावर पुढील निर्णय घेता येईल. प्रत्येकजण कोणती जागा हवी यासाटी आग्रह करु शकतो. त्यांचा अधिकार आहे. पण अंतिम निर्णय तीन नेते घेणार आहेत,'' असं सुनील तटकरेंनी सांगितलं. कोणी कोणताही प्रस्ताव दिलेला नाही. चर्चा होईपर्यंत काही कालावधी जातो. तो उद्या दुपारपर्यंत आहे असंही ते म्हणाले.